# महाराष्ट्र शासन

विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल.
शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल, जि.रायगड - ४१० २०६.
ई-मेल पत्ता :- jdhe.pnvl-mah@gov.in Webside :- http://jdhepanvel.org दूरध्वनी व फॅक्स नंबर (०२२) २७४५३८२०

जा.क्र.विसस/उशि/कोविप/मशि-१/नवीन विषय/२०१७-१८/ 2072 दिनांक :- २१/०७/२०१७

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यांत येते की, डोंबिवली शिक्षण प्रसारक मंडळाचे के. व्ही. पेंढारकर कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स ॲन्ड कॉमर्स, प्लॉट नं. एसपीएल - ४, एम. आय. डी. सी. ऑफिस समोर, डोंबिवली (पूर्व), जि. ठाणे - ४२१ २०३. येथे अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयामध्ये शासन आदेश क्र. एनजीसी - २०१७/(१०१/१७)/ मशि-४, दिनांक: २३ जून, २०१७ (अ. क्र. ११) नुसार एम. ए. हिस्ट्री हया नवीन विषयास सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून उपरोक्त शासन मंजूरी आदेशातील अटी व शर्तीना अनुसरून कायम विना अनुदानित तत्वावर सुरू करण्यास परवानगी देण्यांत आलेली आहे. शासन आदेशातील अटी व शर्तीप्रमाणे संस्था/ महाविद्यालयाकडून रू. १००/-च्या भारतीय गैरन्यायिक मुद्रांक पेपरवर उपरोक्त अभ्यासक्रम चालविण्यासाठी शासनाकडून भविष्यात कोणत्याही स्वरूपातील अनुदानाची मागणी केली जाणार नाही. असे हमीपत्र महाविद्यालयाकडून/ संस्थेकडून दिनांक १७.०७.२०१७ अन्वये शासन निर्देशाप्रमाणे या कार्यालयाकडे सादर केलेले आहे.

"महाराष्ट्र विद्यापीठ कायदा-१९९४" अंतर्गत तरतुदीनुसार मर्यादित विद्यार्थी प्रवेश तसेच प्रवेशित विद्यार्थी संख्येच्या बिगतवारीसह नियतकालिक आढावा, नॅक ॲक्रिडीएशन बाबत करावयाची कार्यवाही आणि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार शैक्षणिक अर्हताधारक अध्यापक वर्ग आणि अर्हताधारक व अनुभवी शिक्षकेतर कर्मचारी वर्ग नियुक्त करण्याच्या अटींच्या अधिन राहून शासन मंजूरी आदेशातील मार्गदर्शक सूचना व प्रचलित नियमानुसार विद्यापीठाने या संस्थेच्या / महाविद्यालयाच्या वर उल्लेखित नवीन महाविद्यालय/ विषय/ तुकडी/ विद्याशाखा/ अभ्यासक्रमासाठी पुढील संलग्निकरण्याची प्रक्रिया सुरू करण्यास या कार्यालयाची हरकत नाही.

RBhosle 28/7/17
विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल.

स्थळः- पनवेल
दिनांकः- २१/०७/२०१७
प्रत :-

१. कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई -३२ / एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, चर्चगेट, मुंबई - २० यांना सूचित करण्यात येते की, विद्यापीठांनी त्यांच्या संलग्निकरणात येत असलेल्या या महाविद्यालयाच्या वरील मंजूरी मिळालेल्या अभ्यासक्रमांचे / विद्याशाखांचे विहित शैक्षणिक शुल्क, विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या भौतिक सुविधा, पात्रताधारक अध्यापक वर्ग व तत्सम स्वरुपाच्या आवश्यक असणाऱ्या बाबी व इमारत, वर्ग खोल्या, पुरेशी आसन व्यवस्था उ. बाबी पूर्ण करण्याच्या सूचना, तसेच **बार कौसिल ऑफ इंडिया, एन.सी.टी.ई / ए.आय.सी.टी.ई., नॅक यांचेकडील ना- हरकत प्रमाणपत्र तात्काळ प्राप्त करण्याच्या सूचना पुनश्चः उपरोक्त संस्थेच्या निदर्शनास आणून द्याव्यात.**

उपरोक्त मान्यता नवीन महाविद्यालय/ अभ्यासक्रम/ विद्याशाखा/ विषय/ तुकडया सुरु करण्यात आलेल्या महाविद्यालयांनी **ज्यांची स्थापना होऊन ५ वर्ष झाली आहेत त्यांनी एक वर्षात व ज्यांची ५ वर्षे झालेली नाहीत त्यांची ५ वर्षे पूर्ण होताच एक वर्षात नॅक ॲक्रिडिएशन प्राप्त करुन घ्यावे व ते या कालावधीत न मिळविल्यास सदर विद्याशाखा मान्यता आपोआप रद्द होईल.** तसेच शासन निर्णयानूसार कळविण्यात आल्याप्रमाणे शासनाने दिलेल्या अटी व शर्ती यांचे पालन होते किंवा नाही याबाबत खात्री करुन संलग्निकरणाचा अहवाल शासनास व संचालनालयास पाठवून केलेल्या कार्यवाहीची प्रत या कार्यालयास पाठवावी.